ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# कौटुंबीक हिंसाचार कायदा व स्त्रीयांवरील अत्याचार



**डॉ. पंडित महादेव लावंड**
**श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी**

## प्रास्ताविक -

कुटूंबसंस्था ही सर्वात जुनी सामाजिक संस्था आहे. व्यक्तीची जडणघडण कुटूंबातून होते. कुटूंबातूनच कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. व्यक्तीच्या भावी काळातील वर्तनावर कुटूबाचा प्रभाव पडतो. कुटूंबातील सं◌ंस्कार माणसाला मोठेपणी कामाला येतात. लहानपणी माणसावर कशाप्रकारचे संस्कार झाले आहेत यावरच माणूस भविष्यात कोणत्या पद्धतीने वाटचाल करेल हे ठरते. त्यामुळे माणसावर कोणत्या प्रकारचे संस्कार होतात हे खुप महत्वाचे आहे.

रक्तसंबंधातून कुटूंबसंस्था निर्माण झाली आहे. कुटूंबात ऐकमेकासी रक्ताची नाती असणारी माणसे राहतात. रक्तसंबंधातून कुटूंबसंस्था निर्माण झाली असल्यामुळे कुटूंबातील सर्वाच्या मनात प्रेमाची, अपुलकी, मायेची भावना तयार होते. ऐकमेकाबद्द्ल वाटणारे प्रेम, माया यातून कुटूंबातील सभासद एकमेकासाठी त्याग करावयास तयार होतात. रक्तसंबंधातून ही नाती तयार झाली असल्यामुळे कुटूंबातील सभासद एकमेकासाठी त्याग करावयास सहज तयार होतात. परस्परासाठी त्याग करण्यात त्यांचा कोणताही स्वार्थ असत नाही. प्रेमाची एकमेकाबद्द्ल आपुलकीची वाटणारी भावना यामुळे कुटूंबातील सभासद एकमेकासाठी त्याग करत असतात. एकमेकासाठी त्याग करण्याची कुटूंबात पंरपराअसल्यामुळे कुटुंबातील सभासदाचा विकास होतो व त्यातूनच संपुर्ण कुटूबाचा विकास होतो. त्यामुळे आपणास असेच म्हणता यईल की, व्यक्तिच्या विकासात, जडणघडणीत कुटूबाची भुमिका खुप महत्वाची आहे. कुटूबाशिवाय व्यक्ती मानसिक दृष्ट्या सक्षम होवु शकत नाही. राहू शकत नाही. मानसाचा विचार आपणास एखाद्या यंत्राप्रमाणे करता येणार नाही कारण माणूस हा हाडा मासाचा मन, बुद्धी असणारा आहे. माणसाला माणसाची गरज आहे. माणसाला आपल्याबद्द्ल प्रेम, आपुलकी असणारी माणसे हवी वाटतात. अशी माणसे कुटूंबात असतात. त्यामुळे कुटूंबसंस्था खुप महत्वाची आहे. कुटूंबात कोणत्याही प्रकारच्या स्वार्थाला, व्यवहारी बुद्धीला थरा दिला नाही तरच खऱ्याअर्थाने माणसे कुटूंबात परस्पराबद्द्ल वाटणारा प्रेमाने आपुलकीने राहू शकतील. स्वार्थ साधणारी माणसे कुटूंबात असून चालत नाहीत तशाप्रकारची माणसे जर कुटूंबात असतील तर कुटूंब विभक्त होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे स्वार्थ,परस्परातील स्पर्धा कुटूंबाच्या ऐक्याच्या दृष्टीने हानिकारक आहेत. प्रेमश्, जिव्हाळा, माया, एकमेकाबद्दल वाटणारी आपुलकी या गोष्टी कुटूंबासाठी आवश्यक आहेत. ज्या कुटूंबात प्रेम माया जिव्हाळा आहे, असे कुटूंब दिर्घकाळ असे अस्तित्वात राहते.

कुटूंबपद्धती रक्तसंबंध, प्रेम, आपुलकी, त्याग यातून निर्माण झाली व टिकून राहिली आहे. त्याचबरोबर कुटूंबात काही मुल्य, रुढी, प्रथा, परंपरा निर्माण झालेल्या असतात. कुटूंबातील सभासद आपल्या कुटूंबातील मुल्याची जपणूक करतात. रुढी, प्रथा, परंपरेचे अनुकरण करतात. आपल्या कुटूंबातील रुढी, प्रथा, परंपरा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. काळाबरोबर रुढी, प्रथा, परंपरा या मध्ये कुटूंबातील सभासद बदलही करतात. बदलत्या परस्थितीत त्या प्रवाही बनवतात. त्याचबरोबर कुटूंबाचे काही निती नियमही तयार झालेले असतात. कुटूंबाचे निती नियम पाळण्याचे नैतिक बंधन कुटूंबातील

सभासदावर असते. कुटूंबातील या निती नियमाला कुटूंबातील सभासदाची फर मोठी संमती असेल तर असे निती नियमाचे सभासद अनुकरण करतात. रुढी, प्रथा, परंपरा, निती नियम हे कुटूंबाचे आधार आहेत. त्यामुळे कुटूंबातील रुढी, प्रथा, परंपरा प्रवाही बनवणे खुप महत्त्वाचे आहे. कुटूंबातील निती नियमातही काळाबरोबर आवश्यकतेप्रमाणे बदल करणे खुप महत्त्वाचे आहे. तरच खऱ्या अर्थाने कुटूंब संस्था टिकून राहील. कुटूंब संस्था टिकूण राहणे मानवी समाजाच्या दृष्टिने खुप महत्त्वाचे आहे. आजपर्यंत कुटूंबसंस्था टिकून राहिल्यामुळे आपणास असे म्हणता येईल की, कुटूंबाशिवाय मानसाला आनंदी, सुखी समाधानी जीवन जगता येणार नाही . त्यामुळे कुटूंबसंस्था टिकवून ठेवणे खुप महत्वाचे आहे.

भारतातील कुटूंब पद्धतीला प्राचीन काळापासूनचा इतिहास आहे. भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौद्ध इत्यादी धर्माचे लोक राहतात. प्रत्येक धर्माच्या प्रथा, परंपरा वेगवेगळया आहेत. त्यामुळे कुटूंबपद्धतीत जाती-जातीत, धर्मा-धर्मात वेगळेपणा दिसतो. भारतात पुर्वीच्या काळी एकत्रित कुटूंब पद्धती होती. एकत्रित कुटूंब पद्धतीमुळे कुटूंबाचा आकार मोठा होतो. एकाच कुटूंबात अनेक लोक राहत होते. एकत्रित कुटूंबपद्धतीचे काही फायदे होते त्यामुळे ती फार काळ टिकून होती. मात्र एकत्रित कुटूंबात शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. एकत्रित कुटूंबात फारसे शिक्षण होत नाही. ही इतिहासाची साक्ष आहे. घरातील कर्ता पुरुष फक्त स्वत:च्या मुलाबाळाची शिक्षणाची काळजी घेतो. इतराच्या शिक्षणाची फारशी काळजी घेत नाही. त्यामुळे कुटूंबात एकोपा टिकून राहणे अवघड घेऊन बसंते कुटूंबसंस्था ही परस्पराबद्दल त्याग करण्याच्या भावनेवर आधारलेली आहे. परस्पराबद्दलचे प्रेम, माया, त्याग करण्याची वृत्ती जशी-जशी कमी होत जाईल तस-तसे कुटूंब विभक्त होण्याचा धोका वाढतो. एकत्रित कुटूंबपद्धती भारतात मोडित निघण्याचे हेच खरे कारण आहे.

अलिकडील काळात एकत्रित कुटूंबपद्धती मोडित निघाल्यामुळे छोटी-छोटी कुटूंब तयार झाली आहेत. कुटूंबाचा आकार लहान झाल्यामुळे कुटूंबाला अनेक पेचप्रसंंगाला तोंड द्यावे लागते आहे. कुटूंबात परस्पराबद्धलचे प्रेम, माया, त्याग करण्याची तयारी कमी झाल्यामुळे कुटूंबसंस्था अडचणीत येऊ लागली आहे. कुटूंबापुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. कुटूंबात पती पत्नीचे संबंध खुप महत्वाचे आहेत. पती-पत्नीच्या संबंधात तणाव निर्माण झाला तर कुटूंबात अनेक पेचप्रसंग निर्माण होतात. पती-पत्नीचे संबंध परस्पराबद्दल वाटणारे प्रेम, माया, त्याग करण्याची वृत्ती कमी होत जाईल. तस-तसे कुटूंब मोडित निघण्याचा धोका असतो. त्याचबरोबर पती-पत्नीचे नाते हे परस्परातील विश्वासावर आधारलेले आहे. त्यामुळे पती-पत्नीने एकमेकाच्या विश्वासास पात्र झाले पाहिजे. एकमेकावर टाकलेल्या विश्वासाचा घात केला नाही तरच कुटूंब मोडित निघणार नाही. भारतात कुटूंबपद्धती पुरुषसत्ताक आहे. कुटूंबाचे नेतृत्व पुरुषाकडे आहे. त्यामुळे सहाजीकच कुटूंबातील सर्व सभासदाचे पाल करण्याची जबाबदारी त्याच्यावर येते. पुरुषसंत्ता कुटूंबामुळे भारतात स्त्रियांना कुटूंबात मानाचे स्थान, समान स्थान मिळत नाही. स्त्रीयांवर त्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर अन्याय होण्याची शक्यता असते. त्यातुनच पती-पत्नी , सासू-सासरे यांच्यात संघर्ष निर्माण होण्याचा धोका असतो. त्यातूनच कधी कधी काही कुटूंबात हिंंसाचारही होतो. त्याचा विपरीत परिणाम कुटूंबातील मुलांनवर होतो. त्यामुळे पती-पत्नीने एकमेकांना तेवढीच किंमत देणे खुप महत्वाचे आहे . वर्चस्व खोर प्रवृत्तीतून अशा प्रकराचे संघर्ष उद्भवतात.

कुटूंबात एकोपा टिकून राहण्यासाठी सर्वांनी समंजसपणे वागने खूप महत्वाचे आहे. मुलांच्या मनात मोठेपणी वडीला विषयी शत्रुत्वाची भावना तयार होते. वडिलापंेक्षा मुले मित्र-मैत्रीनीचे अधिक एकणे पसंत करतात आणि कुटूंबियाचा रोष ओढावून घेतात त्यामुळे कुटूंबात संघर्ष निर्माण होतो. त्यामुळे कुटूंबातील प्रेम, जिव्हाळा, माया, परस्पराबद्दल त्याग करण्याची वृत्ती कमी होते. परिणामी कुटूंब विभक्त होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून कुटूंबातील मुल्य, प्रथा, परंपरा याचे मुली-मुलींने पालन करणे गरजेचे आहे. कुटूंब प्रमुखानेही काळानुरुप रुढी, प्रथा, परंपरात बदल केल्या पाहिजे तरच कुटूंबसंस्था टिकून राहील. भारतीय कुटूंब पद्धतीत बालसंगोपनाची जबाबदारी पत्नीवर असल्यामुळे कुटूबात पत्नीची भूमिका खुप महत्वाची आहे. तर कुटूंबप्रमुखावर कुटूंबाच्या पालन पोषनाची जबाबदारी असल्यामुळे कुटूंबप्रमुखास आपल्या कर्तव्याचे भान असने महत्वाचे आहे. कुटूंबप्रमुखाची कुटूंंबातील सत्ता पारंपरिक सत्ता आहेत. परंपरेणे ती चालत आली असल्यामुळे कुटूंबातील लोक तिचा आदर करतात. कुटूंब प्रमुखाची आज्ञा इतर कुटूंबातील लोक पाळतात. कुटूंबप्रमुखाची ही सत्ता रुढी, प्रथा, परंपरा व सवयीने स्वीकारलेली असल्यामुळे कधी-कधी कुटूंबप्रमुखाकडून स्वईच्छेने आपल्या मर्जीनुसार इतरानी वागावे असी सक्ती केली जाते. मात्र कांही वेळेस कुटूंबातील सभासद अशा प्रकारे केली जाणारी सक्ती स्वीकारण्यास तयार नसतात. अशा प्रकारची सक्ती कुटूंबात होत असेल तर कुटूंबात आपल्या इच्छेला कांही स्थान नाही. असी भावना झाल्यामुळे कुटूंबप्रमुख व कुटूंबातील इतर सभासद यांच्यात संघर्ष होतो व कुटूंबाचे ऐक्य त्यामुळे धोक्यात येते. म्हणूनच कुटूंब प्रमुखाने कुटूंबातील इतर

सभासदरावर त्यांच्या इच्छा आकाक्षाच्या विरोधी आपल्या इच्छा, आंकांंक्षा फार मोठ्या प्रमाणावर टोकाची भूमिका घेऊन लादू नयेत तरच कुटूबात फार मोठे पेचप्रसंग निर्माण होणार नाहीत.

भारतात कुटूंबसंस्था टिकून राहण्यासाठी अनेक कायदे केले आहेत. स्त्री-पुरुषातील वैवाहिक संबंधात संघर्ष निर्माण झाला तर कुटूंबावर फार मोठा परिणाम होतो. पुरुषसत्ताक कुटूंबामुळे फार मोठा परिणाम होतो. पुरुषसत्ताक कुटूंबामुळे पुरुषावर कुटूंबाची जबाबदारी आहे. कुटूंबातील आई, वडील, पत्नी, मुले, मुलीच्या सांभाळाची व पालनपोषनाची जबाबदारी कुटूंब प्रमुखावर आहे. त्यामुळे भारतात सर्व जाती धर्मातील लोंकासाठी पत्नी, मुले, आई, वडिल यांच्या चरितार्थाची तरतूद C.R.P.C 125 अन्वये करण्यात आली आहे व C.R.P.C 126 अन्वये कुटूंबप्रमुखाकडून वसुली करण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे कोणत्याही जाती धर्मातील लोकांना जाती धर्माचे नियम कांहीही सांगत असो कुटूंबातील पत्नी ,आई, वडील, मुले यांच्या पालकत्वाची जबाबदारी कायद्याने कुटूंबप्रमुखाला नाकारता येणार नाही. तसा कायदेशीर अधिकार C.R.P.C 125, 126 अन्वये कुटूंबातील सभासदांना मिळाला आहे.

भारतात हिंदू ,मुस्लिम, ख्रिश्चन या धर्मातील लोकांसाठी वेगवेगळे कायदे केले आहेत. प्रत्येक जाती धर्मातील स्त्रीयांना संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळ धर्मपरत्वे स्त्रीयांच्या संरक्षात बदल भारतात दिसून येतो. कुटूंबातील पती-पत्नीला सहजासहजी आपले नाते संपुष्टात आणता येणार नाही. अशा प्रकारच्या तरतुदी कायद्याने केल्या आहेत. एकूण एक कायद्याचा उद्देश कुटूंबपद्धती टिकून ठेवणे हा आहे. पती-पत्नीला एकमेकापासून घटस्फोट घेता येतो. मात्र घटस्फोटासंदर्भातही फार कायद्याने कडक तरतुदी केल्या आहेत. पती व पत्नी दोघांच्या संमतीशिवाय दोघांनाही घटस्फोट घेता येत नाही आणि दोघांचीही घटस्फोटाला संमती असली तरी कोर्टाला सहा महिन्यापर्यंत घटस्फोट देता येत नाही. पत्नीला जर पतीने घटस्फोट दिला तर पतीला दरमहा कोर्ट ठरवून देईल तेवढी पोटगी द्यावी लागेल. थोडक्यात सहजासहजी कुटूंबपद्धती मोडित निघू नये अशा प्रकारच्या तरतुदी केल्या आहेत. त्याचबरोबर कायद्याने दिलेला घटस्फोटच घटस्फोट मानला जाईल. कोणत्याही जाती धर्माच्या नियमाने दिलेला घटस्फोट घटस्फोट मानला जाणार नाही असी कायद्यात तरतुद आहे. कायद्याने स्त्रियांना संरक्षण देण्याची फार मोठी आवश्यकता आहे कारण कुटूंबाचे नेतृत्व पुरुषाकडे आहे. स्त्रीयांचें फारशे हक्क रुढी, प्रथा, परंपरेने मान्य केले गेलेले नाहीत. त्यामुळे स्त्रीयांचे हक्काचे कायदे पास करावे लागतात. त्याचबरोबर पुरुषाच्या मानसिकतेतही बदल घडवून आणने गरजेचे आहे.

2006 मध्ये संसदेत Domestic Violence Act पास करुन स्त्रीयांना कौटूंबीक हिंसाचारापासून संरक्षण दिले आहे. पतीच्या घरात राहूनच चरितार्थ चालविण्याचा अधिकार या कायद्याने विवाहित पत्नीला दिला आहे. त्यामुळे स्त्रीयांना घराबाहेर पतीला काढता येणार नाही. त्याचबरोबर 1955 च्या Hindu Marriage Act कलन 9 नुसार पती-पत्नी संबंध टिकावे म्हणून जोडिदाराने वैहिवाहीक सूख द्यावे असा कोर्टामार्फत आदेश मिळविता येतो. त्याचबरोबर रुढी परंपरेनुसार घटस्फोटाची तरतुद होती. परंतू कायद्यात बदल करुन आलीकडील काळात न्यायालयामार्फत दिलेला घटस्फोटच मान्यता प्राप्त धरला जातो. हिंदू स्त्रीयाप्रमाणेच मुस्लीम स्त्रीयांना देखील C.P.C 125 अन्वये चरितार्थाचे अधिकार दिले आहेत. हिंदू घरगुती हिंसाचार कायद्यान्वये पतीच्या घरात पत्नीला जीवनाची सुरक्षिततेची हमी व चरितार्थाची सोय करण्याची तरतूद आहे. अशा प्रकारच्या कायद्यात तरतुदी करण्याचा उद्देश भारतीय कुटूंबपद्धती टिकून राहावी हा आहे.

वरीलप्रमाणे कुटूंब व कुटूंबातील पती-पत्नीच्या संदर्भात कायदे केले असले तरी कायदा हा एकमेव कुटूंबपद्धती टिकवून ठेवण्याचा आधार होऊ शकत नाही. कायदे करुन फार तर कुटूंबपद्धती टिकवून ठेवण्यास हातभार लावता येईल. कुटूंब मोडित सहजासहजी निघू नयेत अशी व्यवस्था करता येईल. असा आपणास निष्कर्ष काढता येईल. मात्र कुटूंससंस्था ज्या आधारामुळे निर्माण झाली आहे त्याकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही. त्याचप्रमाणे कुटूंबासंस्था अस्तित्वात येण्याचे प्रयोजन काय होते. हे ही विसरुन चालणार नाही. कुटूंबाची मानवी समाजाला खूप गरज आहे. कुटूंबाशिवाय माणूस अर्थपूर्ण जीवन जगू शकत नाही. लक्षात घेऊन कुटूंबपद्धती कशा प्रकारे टिकून राहील. याचाच आपण विचार केला पाहिजे. रक्तसंबंधातून निर्माण झालेली कुटूंबसंस्था प्रेम, माया, जिव्हाळा, परस्पराबद्दल त्याग करण्याची वृत्ती यातूनच आपणास टिकवता येईल. कायदा करुन कुटूंबपद्धती आपणास टिकवता येणार नाही. कारण कुटूंबसंस्था कायदेमंडळाच्या कायद्याने अस्तित्वात आलेली संस्था नाही. तर परस्पराशी असलेल्या रक्तसंबंधातून अस्तित्वात आलेली आहे. कुटूंबातील सभासदांना एकमेकाबद्दल वाटणारे प्रेम, माया, त्याग यामुळे कुटुंबपद्धती आजही टिकून आहे. भारतात आणि एकूण जगभरात कुटूंबपद्धती टिकून राहणे मानवमात्राच्या हिताचे आहे. त्याशिवाय माणसाला सुखी, समाधानी, शांत, सुरक्षित जीवनच जगता येणार नाही.

त्यामुळे कुटूंबसंस्था मोडित निघेल अशाप्रकारची सांस्कृतिक मूल्य भारतीयांनी स्वीकारू नयेत. कुटूंबपद्धतीला हानिकारक असणाऱ्या गोष्टी स्वीकारू नयेत. कुटूंबसंस्था मोडित काढू पाहणाऱ्या पाश्चिमात्य संस्कृतीचे आपण अनुकरण केले नाही पाहिजे असे आपणास म्हणता येईल.

**संदर्भ :**


1) दैनिक लोकसत्ता, दिनांक 17 सप्टेंबर 2011
2) दैनिक लोकसत्ता, दिनांक 05 नोव्हेंबर 2011
3) दैनिक लोकसत्ता, दिनांक 10 डिसेंबर 2011
4) नानिवडेकर मेघा, (संपा) 2006, महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन, पुणे
5) साने गिता, 1997, भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशनगृह मुबई,
6) पाटील पद्मजा व जाधव शोभा, 2007, भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन, कोल्हापूर
7) Domestic Violence Act. 2006.
8) The Hindu Marriage Act, 1955